सार्वमत

# नाशिकमध्ये पहिल्या विभागीय कार्यालयाची स्थापना करत स्टार हेल्थची पोहोच मजबूत

**नाशिक । प्रतिनिधी**

भारतातील आघाडीच्या स्वतंत्र आरोग्य विमा कंपन्यांपैकी एक स्टार हेल्थ अँड अलाइड इन्शुरन्स कंपनी लिमिटेड ने आज नाशिक येथे पहिल्या विभागीय कार्यालयाचे उद्घाटन झाल्याची घोषणा केली. महाराष्ट्रातील वेगाने विकसित होत असलेल्या टियर-2 आरोग्य विमा बाजारपेठांपैकी एक असलेल्या नाशिकमधील कंपनीची गुंतवणूक दृढ झाली आहे.

ग्राहकांना स्थानिक स्तरावर अधिक सुलभ सेवा उपलब्ध करून देणे, आरोग्यसेवा भागीदारांना सहाय्य करणे, दाव्यांच्या निराकरण प्रक्रियेला गती देणे आणि या भागातील स्टार हेल्थच्या विस्तृत सल्लागार नेटवर्कशी प्रभावी संवाद या उद्देशाने हे नवीन कार्यालय सुरू करण्यात आले आहे. स्टार हेल्थ इन्शुरन्सचे बिझनेस हेड विजय अरोरा यांच्या हस्ते झोनल ऑफिसचे उद्घाटन करण्यात आले.

वाढती आरोग्यजागरूकता, खाजगी आरोग्यसेवेची वाढती मागणी, वाढते वैद्यकीय खर्च आणि विस्तारत असलेले कॅशलेस हॉस्पिटल नेटवर्क यांमुळे आरोग्य विम्याचे महत्त्व वाढले आहे.स्टार हेल्थ अँड अलाइड इन्शुरन्सचे संचालक हिमांशु वालिया म्हणाले: नाशिक हे महाराष्ट्रातील सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या टियर-२ आरोग्य विमा बाजारांपैकी एक आहे. शहरातच दर्जेदार उपचारांना मिळणारे वाढते प्राधान्य या घटकांमुळे हा विकास होत आहे.

महाराष्ट्रात आर्थिक वर्ष २६ दरम्यान स्टार हेल्थने २३०० कोटी पेक्षा अधिक मूल्याच्या दाव्यांचे निराकरण केले आहे ३.५ लाखांहून लोकांना विमा संरक्षण दिले आहे. कॉर्पोरेट रुग्णालये, विशेषज्ञ क्लिनिक्स आणि नर्सिंग होम्स यांच्या पाठबळामुळे नाशिकमधील नागरिक शहरातच दर्जेदार आरोग्यसेवा घेण्यास प्राधान्य देत आहेत.स्मार्ट सिटी अंतर्गत विकसित पायाभूत सुविधा, उत्तम रस्ते संपर्क आणि तुलनेने कमी आरोग्यसेवा खर्च यांमुळे नाशिकमध्ये आसपासच्या जिल्ह्यांमधील रुग्णही येत आहेत.

व्यवसाय प्रमुख विजय अरोरा म्हणाले, नाशिक झोनल कार्यालयाची रचना ग्राहक, सल्लागार आणि आरोग्यसेवा भागीदारांना क्षेत्रीय स्तरावर प्रभावी सहाय्य देण्यासाठी करण्यात आली आहे. मुंबई नाका येथील स्थानामुळे येथे सहज पोहोचता येते. या भागात ९ हजारांपाक्षा अधिक सल्लागार कार्यरत आहेत. जुन्या मुंबई-आग्रा रोडवरील मुंबई नाका येथील श्री कालिका प्लाझामध्ये हे कार्यालय असून मुख्य रस्त्यावर सहज जाता येणं आणि व्यावसायिक तसेच निवासी भागांशी उत्कृष्ट संपर्क उपलब्ध आहे. नाशिकमध्ये आता स्टार हेल्थची 4 कार्यालये, १ विमा केंद्राचा समावेश असून, शहर आणि आसपासच्या बाजारपेठांमध्ये ग्राहक, सल्लागार आणि आरोग्यसेवा भागीदारांसाठी सेवा पोहोच मजबूत झाली आहे.

दावे सहाय्य व्यवस्थेमुळे राज्यभरातील कुटुंबांना वेळेवर उपचार मिळविणे आणि आरोग्यसेवा खर्चाचे व्यवस्थापन करणे शक्य झाले आहे. स्थापनेपासून आजपर्यंत महाराष्ट्रात स्टार हेल्थने १३ हजार ८६६ कोटी पेक्षा अधिक मूल्याचे दावे निकाली काढले असून २६.४ लाखांहून अधिक दाव्यांचे निराकरण केले आहे. आर्थिक वर्ष २६ मध्ये महाराष्ट्रात




कंपनीने १४ टक्के वार्षिक वाढ नोंदवली आहे.राष्ट्रीय स्तरावर आर्थिक वर्ष २६ मध्ये स्टार हेल्थने ११ हजार ९०३ कोटी चे दावे निकाली काढत ३०.६ लाख दाव्यांचे निराकरण केले. स्थापनेपासून आजपर्यंत कंपनीने ६७ हजार ८०० कोटी पेक्षा अधिक मूल्याचे दावे निकाली काढले असून १.५ कोटींपेक्षा जास्त दाव्यांचे निराकरण केले आहे. कंपनीच्या दावे व्यवस्थापन क्षमतेला ९२ टक्के किरकोळ दावे निकाली काढण्याचे प्रमाण, ८४ टक्के कॅशलेस दावे निकाली काढण्याचे प्रमाण आणि ९२ टक्के कॅशलेस दावे ३ तासांच्या आत प्रक्रिया केल्याचा मजबूत आधार आहे. डिजिटल प्लॅटफॉर्ममुळेही दावे प्रक्रियेला अधिक गती मिळत असून, सध्या ७५ टक्के दावे स्टार हेल्थच्या नव्या क्लेम्स प्लॅटफॉर्मद्वारे हाताळले जात आहेत.

नियोजित रुग्णालयीन उपचार प्रक्रिया अधिक सोपी आणि कमी तणावपूर्ण करण्यासाठी स्टार हेल्थने टॉक टू स्टार ही ग्राहकांसाठी समर्पित प्री-ॲडमिशन मार्गदर्शन सेवा सुरू केली आहे. रुग्णालयात दाखल होण्यापूर्वी ग्राहक टॉक टू स्टारवर संपर्क साधून त्यांच्या पॉलिसीतील संरक्षण, नेटवर्क रुग्णालयांचे पर्याय, कॅशलेस प्रक्रियेविषयी माहिती आणि आवश्यक कागदपत्रांची तयारी याबाबत मार्गदर्शन मिळवू शकतात.ही सेवा ग्राहकांना शेवटच्या क्षणी होणारा गोंधळ टाळण्यासाठी, दाखल होताना असलेली अनिश्चितता कमी करण्यासाठी आणि उपलब्ध लाभ व पुढील प्रक्रियेबाबत अधिक स्पष्टता मिळवून देण्यासाठी तयार करण्यात आली आहे.

प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध या मार्गदर्शनामुळे ग्राहक आणि त्यांचे कुटुंबीय अधिक माहितीपूर्ण निर्णय घेऊ शकतात आणि उपचार व पुनर्वसनावर लक्ष केंद्रित करू शकतात. रुग्णालयात दाखल होण्याचे नियोजन करणाऱ्या ग्राहकांना दाखल होण्यापूर्वी मार्गदर्शन आणि सहाय्य मिळविण्यासाठी सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत ७६७६९०५९०५ या क्रमांकावर टॉक टू स्टारशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

स्टार हेल्थची नाशिकमधील गुंतवणूक केवळ विमा सेवांपुरती मर्यादित नसून सीएसआर अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या आरोग्य सेवा केंद्राद्वारे प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, लवकर निदान आणि आरोग्यजागरूकता यांद्वारे संपूर्ण समुदायाच्या आरोग्यसेवेलाही चालना दिली जात आहे. नाशिकमधील आरोग्य सेवा केंद्र स्थानिक समुदायांना सेवा देत असून, रुग्ण भेटींची संख्या सातत्याने वाढत आहे.महाराष्ट्रभर स्टार हेल्थची ५ आरोग्य सेवा केंद्रे कार्यरत असून या केंद्रातून एकत्रितपणे जवळपास १५००० लाभार्थ्यांना सेवा मिळाली आहे. राष्ट्रीय स्तरावर हा कार्यक्रम ९ राज्यांमधील ३२ क्लिनिक्समध्ये कार्यरत असून, वंचित समुदायांमध्ये प्राथमिक आरोग्यसेवा अधिक सुलभ करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत आहे.